॥

सहपत्र क्र. -1

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)

बैठक क्र. 55

**इतिवृत्त**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 55, दि. 14.05.2022 रोजी सकाळी 11.00 ते 1.00 या वेळे Online पध्दतीने आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस विद्यापीठातील सदस्य प्रत्यक्ष तर बहिस्थ सदस्य Online उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. डॉ. कविता साळुंके — | प्रोफेसर,अध्यक्ष व प्र.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 2. डॉ. संजिवनी महाले — | प्रोफेसर, सचिव, व सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद |
| 3. डॉ. मिना कुटे | माजी प्राचार्य ,पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन मुंबई |
| 4. डॉ.गजानन गुल्हाणे | प्रमुख, पदव्युत्तर विभाग, अमरावती विद्यापीठ, अमरावती |
| 5. डॉ.सुलभा दि. देशमुख | प्राचार्य, एस.एस.कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद |
| 6. डॉ. अशोक राणे | प्राचार्य, खांदेश एज्यु. सोसा.चे कॉलेज ऑफ एज्युकेशन जळगांव. |
| 7. डॉ. राधिका ईनामदार, | प्राचार्य, एस.पी. कॉलेज, पुणे |
| 8. डॉ. सुनंदा मोरे | प्र,संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| 9. डॉ. सज्जन थूल | प्रोफेसर, मूल्यमापन विभाग |
| 10. डॉ. अभय पाटील | सहाय्यक प्राध्यापक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा |
| 11. डॉ. माधुरी सोनवणे | प्रोफेसर, कृषी विद्याशाखा |
| 12. डॉ. विजया पाटील | प्रोफेसर, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 13. प्रा. विजयकुमार पाईकराव | सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 14. डॉ. डी. डी. पवार | सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 15. डॉ. सुभाष सोनुने | सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |

काही वैयक्तिक अडचर्णीमुळे खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

| | |
|---|---|
| • डॉ.मंजुलिका श्रीवास्तव | विभाग प्रमुख, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी, दिल्ली |
| • डॉ. सूर्या गुंजाळ | संचालक, सी.आय.क्यु. ए. य.च.म.मुक्त विद्यापीठ,नासिक |

मा. संचालक -

डॉ. महाले
डॉ. पाटील - 11/6/22
प्रा. पाईकराव - /6/22
डॉ. पवार
डॉ. सोनुने 01/06/2022

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/979
दि. 16/05/2022

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)
बैठक क्र. 55
**इतिवृत्त**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठक क्र. 55 , दि. 14.05.2022
ह्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय पुढीलप्रमाणे-

| क्रमांक | उप क्रमांक | विषय |
|---|---|---|
| 55. | . | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 01**<br>उपस्थित सदस्यांचे स्वागत व प्रास्ताविक करण्यात आले. |
| 55. | 1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 02**<br>बैठक क्र. 54 च्या परिषदेचे इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. |
| 55. | 2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 03**<br>मागील सभेच्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 55. | 3.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 04**<br>**एम. ए. (शिक्षणशास्त्र) पूर्नरचित शिक्षणक्रम जून 2022 पासून सुरु करणेबाबत..**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या पूर्नरचनेचे कार्य हाती घेण्यात आलेले आहे. सदर अभ्यासक्रमांचे स्वयं-अध्यापन साहित्य विकसित झाले आहे. जून 2022 पासून जूना शिक्षणक्रम (M62 ) M.A. (Education) बंद करुन पूर्नरचित एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम (M82) सुरु करण्याच्या मान्यतेसाठी सादर (सहपत्र 3)<br>**निर्णय :**<br>शैक्षणिक वर्ष जून 2022 पासून जूना (M62 ) M.A. (Education) शिक्षणक्रम बंद करुन पूर्नरचित एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम (M82) सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात आली. आणि सदर विषयाच्या मान्यतेसाठी विद्वत सभेपुढे शिफारस करण्यात आली. |
| | 3.2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 05**<br>**एम ए (शिक्षणशास्त्र) या शिक्षणक्रमाचे शुल्क वाढविण्याबाबत....**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेत एम.ए. शिक्षणशास्त्र हा शिक्षणक्रम कार्यान्वित केला जातो. या शिक्षणक्रमाची पुनर्रचना करण्याचे कार्य नुकतेच पूर्ण झाले आहे. सन २०२२ या तुकडीपासून पुनर्रचित शिक्षणक्रम कार्यान्वित केला जाणार आहे. तसेच या शिक्षणक्रमाचे २०१५ मध्ये ठरविले शुल्क रु १८,०७५ /- होते. ते आजतागायत तसेच आहे. शासन नियमानुसार दर वर्षी त्यात ५% वाढ करता येते. या दोन्ही मुद्यांचा विचार करता २०१५ ते २०१९ या पाच वर्षाची ५% वाढ रु २०००/- होते. शिवाय रु. १०००/- पुनर्रचनेचा खर्च अशी एकूण रुपये ३०००/- शुल्क वाढ करून |



1.2

10

<table>
<tr><td></td><td></td><td>ते आता २१०००/- करावे असे वाटते. त्यातील ६०% रक्कम विद्यापीठ शुल्क व ४०% अभ्यासकेंद्र शुल्क अशी शुल्क विभागणी करण्यासाठी टिप्पणी चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय :** पूर्नरचित एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम (M82) ह्या शिक्षणक्रमाचे शुल्क रु. 21,000/- करण्यास मान्यता देण्यात आली. त्यातील ६०% रक्कम विद्यापीठ व ४०% रक्कम अभ्यासकेंद्र अशी पूर्वीप्रमाणेच शुल्क विभागणी असेल. असे सूचित करण्यात आले आणि सदर विषयाची वित्त समितीपूढे मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.</td></tr>
<tr><td></td><td></td><td>**विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 06**<br>एम ए (शिक्षणशास्त्र) या शिक्षणक्रमाच्या पूर्नरचित शिक्षणक्रमाची लेखक आणि संपादक यादी मान्यतेबाबत...<br>**निर्णय :** एम ए (शिक्षणशास्त्र) या शिक्षणक्रमाच्या पूर्नरचित शिक्षणक्रमाची लेखक आणि संपादक यादीस मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td>55.</td><td>4.1</td><td>**विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 06**<br>स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम सन जून 2022 पासून सुरु करणेबाबत ....<br>स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम मान्यता पूर्नरचनेचे कार्य हाती घेण्यात आलेले आहे. त्यात मूलभूत आणि प्रगत असे दोन स्तर करण्यात आलेले आहेत. मूलभूत स्तरावरील अध्ययन साहित्य विकसित झालेले आहे. त्यामुळे सदर शिक्षणक्रम जून 2022 पासून सुरु करावा असे प्रस्तावित आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :** स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम :मूलभूत , सन जून 2022 पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. आणि सदर विषय मान्यतेसाठी विद्वत सभेपूढे शिफारस करण्यात आली.</td></tr>
<tr><td>55.4</td><td>4.2</td><td>**विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 07**<br>स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम शिक्षणक्रमाच्या नांवात बदल करणेबाबत..<br>स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या पूर्नरचनेच्या वेळी शिक्षणक्रमाचे नांव ठरविण्यात आलेले होते. परंतू त्यात किरकोळ बदल अपेक्षित आहे. बदल मान्यतेसाठी सादर<br><table><tr><td>स्तर</td><td>पूर्वीचे नाव</td><td>सुधारीत नाव</td></tr><tr><td>मूलभूत</td><td>स्वयं-सहाय्यता समूह मूलभूत प्रमाणपत्र शिक्षणक्रम</td><td>स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम : मूलभूत</td></tr><tr><td>प्रगत</td><td>स्वयंसहाय्यता समूह प्रगत प्रमाणपत्र शिक्षणक्रम</td><td>स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम : प्रगत</td></tr></table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | **निर्णय :** स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या नांवातील बदलास मान्यता देण्यात आली. सदर विषयाच्या मान्यतेसाठी विद्वत सभेपूढे शिफारस करण्यात आली. |
| | 4.3 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 08**<br>स्वयंसहाय्य गट प्रेरक/ प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम बंद करणेबाबत..<br>सन 2022 ह्या शैक्षणिक वर्षापासून C-32 स्वयंसहाय्य गट प्रेरक/ प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम बंद करण्यास मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :**<br>C32 -स्वयंसहाय्य गट प्रेरक/ प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम सन 2022 ह्या शैक्षणिक वर्षापासून बंद करण्यास मान्यता देण्यात आली. सदर विषयाच्या मान्यतेसाठी विद्वत सभेपूढे शिफारस करण्यात आली. |
| | 4.4 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 09**<br>स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम- मूलभूत ह्या शिक्षणक्रमाच्या लेखकांची नांवे मान्यतेसाठी सादर (सहपत्र 5)<br>**निर्णय :**<br>स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम :मूलभूत ह्या शिक्षणक्रमाच्या लेखकांच्या नावास मान्यता देण्यात आली. |
| 55. | 1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 10**<br>एकात्मिक शिक्षक शिक्षण शिक्षणक्रम (Integrated Teacher Education Program {ITEP}) सुरु करणेबाबत...<br>बी.ए. बी.एड. हा शिक्षणक्रम शिक्षणशास्त्र विद्याशाखा सुरु करु इच्छिते त्याचा PPR Form विकसन केला आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर (सहपत्र 6)<br>**निर्णय :**<br>एकात्मिक शिक्षक शिक्षण शिक्षणक्रम (Integrated Teacher Education Program {ITEP}) सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. आणि सदर विषयाच्या मान्यतेसाठी विद्वत सभेपूढे शिफारस करण्यात आली. |
| 55 | 2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2022/ 11**<br>**ऐनवेळचे विषय-**<br>विद्याशाखेमार्फत नव्याने विकसित केलेल्या सिलेज विकसन प्रमाणपत्र शिक्षणक्रम तात्विक अभ्यासक्रम आणि प्रात्यक्षिक कार्य मान्यतेसाठी सादर. |

**निर्णय :**

सिलेज विकसन प्रमाणपत्र शिक्षणक्रम यातील तात्विक अभ्यासक्रम, प्रात्यक्षिक कार्यआणि अभ्यासक्रम नावाच्या बदलास मान्यता देण्यात आली.

सिलेज विकसन प्रमाणपत्र शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांची पूर्वीची नांवे आणि सुधारीत नांवे-

| | पूर्वीचे नाव | सुधारीत नाव |
|---|---|---|
| 1 | तंत्रज्ञानाद्वारे सिलेज विकसन | सिलेज विकसन |
| 2 | 73 वी घटना दुरुस्ती आणि गाव विकास/ पंचायतराज | घटनादुरुस्ती आणि पंचायतराज संस्कृती |
| 3 | गांवातील लघुउद्योग संस्कृती विकासासाठी डिजीटायझेशन चा वापर आणि आव्हाने | लघुऊद्योग आणि संसकृती विकसन |
| 4 | कृतिसंशोधन | कृतिसंशोधन |

सदर विषयाच्या मान्यतेसाठी विद्वत सभेपूढे शिफारस करण्यात आली.

शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(डॉ.संजीवनी महाले)
सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

(डॉ.कविता साळूंके)
अध्यक्ष व प्र,संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

मा. कुलगुरु ह्यांचे मान्यतेसाठी सविनय सादर--

मा. कुलगुरु